देशोन्नती




# आर्थिक समावेशन आणि केवायसी योजनेचा लाभ घ्या

## आरबीआयचे विभागीय संचालक सचिन शेंडे यांचे आवाहन

**अर्जुनी मोरगाव :** केंद्र आणि राज्य सरकारने देशातील शेवटच्या नागरिकाला सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून बँक आणि लाभार्थी यांना जनधन योजनेच्या माध्यमातून जोडण्याचे काम केले आहे. केंद्र सरकारच्या जीवन ज्योती विमा योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, किसान सन्माननिधी योजना आणि राज्य सरकारच्या श्रावण बाळ, निराधार,लाडकी बहीण अशा असंख्य योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यासाठी बँकेशी संलग्न केले. या योजना सुरळीत चालू ठेवण्यासाठी ग्राहकांना ठराविक काळात केवायसी करणे आवश्यक असते. आरबीआयच्या वतीने १ जुलै ते ३० सप्टेंबर सामाजिक सुरक्षा योजना अंतर्गत रिकेवायसी आणि आर्थिक समावेशन शिबिरांचे आयोजन देशभरात होत आहेत. देशातील २ लाख ७० हजार ग्रामपंचायत अंतर्गत लाभार्थ्यांना या शिबिरांच्या माध्यमातून डिजिटल फ्राड, सायबर फ्रॉड यावर प्रतिबंध आणून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी रिकेवायसी करिता क्यू आर कोड, एसएमएस प्रणाली, बँक मित्र किंवा बँकेची संपर्क करून रिकेवायसी आणि आर्थिक समावेशन योजनांच्या लाभ घेण्याचे आवाहन आरबीआय नागपूरचे विभागीय संचालक सचिन शेंडे यांनी केले.

ते येथील प्रसन्न सभागृहात आयोजित बँक ऑफ इंडिया शाखा अर्जुनी मोर,आरबीआय आणि वित्तीय सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रिकेवायसी आणि आर्थिक समावेशन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी आरबीआय नागपूरच्या उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ, प्रबंधक जय नारायण, नरेंद्र मडावी, धर्मेंद्र कुमार, रेशीम नेवारे, दिनेश भेंडारकर, अजय गुडधे, नम्रता ठाकरे कमलप्रसाद कोरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ऋत्विज दप्तरी यांनी तर आभार मिथुन बारसागडे यांनी केले. शिबिरात बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक ऑफ बडोदा बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाखेच्या कर्मचारी वृंदानी सहकार्य केले.

## जीवन ज्योती विमा योजनेचे धनादेश वाटप

बँक ऑफ इंडिया शाखा अर्जुनी मोर,आरबीआय आणि वित्तीय सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रिकेवायसी आणि आर्थिक समावेशन शिबिरात विमा सुरक्षा योजना आणि जीवन ज्योती विमा योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेश वितरित करण्यात आले. शिबिरात पंतप्रधान सुरक्षा बीमा योजना ७०, पंतप्रधान जीवन ज्योति योजना ६०, अटल पेन्शन योजना ३० आणि ३५० रिकेवायसी लाभार्थ्यांच्या कार्यक्रम स्थळी नोंदनी करण्यात आल्या. शिबिरात बँक प्रतिनिधी, बचत गटांचे स्टॉल द्वारे लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बचत गट, उत्कृष्ट कर्जदार आणि पीक कर्जदारांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.